# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

## :: जाहिरात ::

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथे खालील पदे भरावयाचे आहेत. सदरील नेमणुक पुर्णत: कंत्राटी पद्धतीची असून संबंधीतास कंत्राटीचे कालावधी पुर्ण होण्यापुर्वी केव्हाही कामावरून कमी करता येईल. सदर पदावर जालना येथील रहिवाशी असलेल्या उमेदवारांस प्राधान्य देण्यांत येईल.

**भरती करावयाचे पदे**

| Sr. No. | Name of the Post | No. of Posts |
|---|---|---|
| 1. | Office Assistant | 2 Posts |
| 2 | Peon | 1 Post |

उमेदवारांनी दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आरपीएडी) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह किंवा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११—०० ते सायंकाळी ०५—०० वाजेपर्यंत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथे ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्याचे नाव लिफाफ्यावर लिहुन अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्याकडे दिनांक २९/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५—०० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

दिनांक २९/०८/२०२५ रोजीनंतर प्राप्त झालेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठवलेले किंवा लिफाफ्यावर पदाचे नाव नमुद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | पदाचे नांव | **Office Assistant** |
| | पदाची संख्या | ०२ (दोन) |
| | वेतन | रूपये २०,०००/— दरमहा वेतन |
| | **शैक्षणिक अर्हता (मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे मार्गदर्शक तत्वाद्वारे)** | |
| | अ) कमीत कमी पदवीधर अथवा कोणत्याही मान्यतापात्र विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीधारकास आणि कायद्याच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल. | |

| | | |
|---|---|---|
| | ब) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा, किंवा शासकीय मंडळ अथवा आयटीआय द्वारे घेतली जाणारी ४० श.प्र.मि. वेगाची इंग्रजी टंकलेखन आणि ३० श.प्र.मि. वेगाची मराठी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असावा. | |
| | क) न्यायालयात सादरीकरणासाठी श्रुतलेखन घेण्याची आणि फायली तयार करण्याची क्षमता | |
| | ड) संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थाकडील प्रमाणपत्रधारक असावा. डी.ओ.ई.ए.सी.सी. / एन.आय.ई.एल.आय.टी., विद्यापीठ, सी—डॅक, एम.एस.—सी.आय.टी, व्यावसायिक शिक्षणक्रम — राज्य सरकार, व्यावसायिक शिक्षणक्रम — केंद्र सरकार, आय.टी.आय. — केंद्र सरकार, आय.टी.आय. राज्य सरकार, तांत्रिक मंडळ | |
| २ | पदाचे नांव | **Peon** |
| | पदाची संख्या | ०१ (एक) |
| | वेतन | रूपये १२,०००/— दरमहा वेतन |
| | शैक्षणिक अर्हता (मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे मार्गदर्शक तत्वाद्वारे) | शैक्षणिक पात्रता — ७ वी पास |

## सर्व पदांकरिता वयोमर्यादा

अ) उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरीता १८ वर्षपेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षपेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या मागासप्रवर्गाकरीता ४३ वर्षपेक्षा जास्त वयाचा नसावा.

ब) शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही.— १०७७/३५७६/१४३३/१६—अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारिरिकदृष्टया अपंग व्यक्ती, जर त्या योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

**कराराची वैधता** :— नियुक्तीचा करार अकरा महिन्या पर्यंत वैध असेल.

**करार संपुष्टात आणणे** :— उमेदवाराच्या सेवा त्याच्या / तिच्या कामगिरीचे मूल्यमापन केल्यानंतर समाधानकारक नसल्यास कोणतीही सूचना आणि स्पष्टीकरण न देता कोणत्याही वेळी संपुष्टात आणल्या जाउ शकतात.

**अधिकार** :— सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्याकडे राखीव आहेत.

## उमेदवारांना सुचना :—

१. अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाणपत्रांचे नमुने जिल्हा न्यायालय, जालनाचे संकेतस्थळ https://jalna.dcourts.gov.in यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.

२. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.

३. उमेदवाराने एका सन्माननीय व्यक्तीची जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचा दाखला सादर करावा. तसेच त्यांचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली / चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

४. विहित नमुण्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

५. सदर जाहिरातीत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवलेले आहेत.

६. Office Assistant या पदासाठी आवश्यक ती संगणकावरील टंकलेखन चाचणी परीक्षा घेण्यात येईल. तसेच उमेदवारांची तोंडी २० गुणांची मौखिक तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

अ) मराठी भाषेतील २० गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटांत ३०० शब्द टंकलिखित करावे लागतील. (३० श.प्र.मि.) उमेदवारांनी केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करून घेतले जाईल.

ब) ज्या उमेदवारांना मराठी भाषेतील टंकलेखन चाचणीमध्ये सेवाप्रवेश समितीने ठरविल्याप्रमाणे कट ऑफ गुण मिळतील असे उमेदवार, इंग्रजी टंकलेखन चाचणी परीक्षा देण्यास पात्र ठरतील.

क) इंग्रजी भाषेतील २० गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटांत ४०० शब्द टंकलिखित करावे लागतील (४० श.प्र.मि.) उमेदवारांनी केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करून घेतले जाईल.

ड) मराठी व इंग्रजी भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करतांना ५ चुकांसाठी १ गुण कापण्यात येईल. तसेच मजकुर वगळणे ही देखील चुक धरली जाईल.

७. ज्या उमेदवारांना इंग्रजी टंकलेखनात सेवाप्रवेश समितीने निश्चित केल्याप्रमाणे कट ऑफ गुण मिळतील त्यांना इंग्रजी टंकलेखन परीक्षेनंतर होणा—या मौखीक परीक्षेसाठी पात्र समजले जाईल. जाहिरात दिलेल्या पदसंख्येपेक्षा तिप्पट उमेदवारांना, त्यांना इंग्रजी टंकलेखन, मराठी भाषेतील टंकलेखन आणि चाळणी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर मौखिक परीक्षेसाठी बोलावले जाईल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या

उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मौखिक परीक्षेसाठी बोलाविले जाईल.

८. शिपाई :— क्रियाशीलता चाचणी व स्वच्छता चाचणी १० गुणांची क्रियाशीलता चाचणी परीक्षा घेतल्या जाईल. या चाचणीमध्ये उमेदवारांच्या हालचालीतील चपळाई व तत्परता, न्यायालय इमारत आणि आवाराच्या स्वच्छतेमधील उमेदवारांचे कौशल्य व चपळाई उमेदवारांकडुन प्रत्यक्ष काम करून घेवुन तपासले जाईल. शिपाई पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची १० गुणांची मौखिक तोंडी मुलाखत घेण्यात येईल. अशा उमेदवारांची संख्या जाहिरात दिलेल्या पदसंख्येच्या तिपटीपेक्षा जास्त नसेल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्ट—लिस्ट केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

९. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

१०. उपरोक्त पदासाठी दिलेली ठोक रक्कम दरमहा मानधन मिळेल या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ मिळणार नाहीत. सदरील नेमणुक पुर्णतः कंत्राटी पध्दतीची राहिल.

## मुलाखत

११. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाण्याची शक्यता आहे. त्यांनी मुलाखतीच्या वेळेस खालील प्रमापत्राच्या साक्षंकीत प्रती आणि त्यांचे मुळ प्रमाणपत्र सादर करावे.

१. जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा / जन्माचा / एस.एस.सी. दाखला)

२. अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.

३. सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नावे मुळ अर्जात नमुद केलेली आहे, त्यांनी दिलेला त्याचे / तिचे चारित्र चांगले असल्याबद्दलचा चारित्र्याचा दाखला.

४. अर्हतेच्या रकान्यात नमुद केल्याप्रमाणे, संगणक प्रचालनाचे विहित ज्ञान असल्याबाबतचा विद्यापीठ / संस्थेने दिलेला दाखला.

५. इंग्रजी व मराठी टंकलेखनातील आवश्यक वेग असल्याबाबतचा शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र शासन किंवा शासकीय मंडळ किंवा आयटीआय यांनी दिलेला दाखला.

६. संबंधीत जिल्हा सरकारी रूग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागु असल्यास

७. शासन विहित करेल त्या प्राधिका–याने दिलेला जातीचा दाखला जेथे लागु असेल तेथे.

८. छोटया लहान कुटुंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना –अ जे जाहिरातीच्या शेवटी उपलब्ध आहे.

१३. समितीने असे ठरविले आहे की, निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण निश्चित करण्यात आले नसतील तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५ टक्के असावेत आणि अनुसुचीत जाती / अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी हे गुण ५ टक्के ची शिथील करावेत.

१४. उमेदवारांना चाचणी परीक्षांसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५. सेवाप्रवेश प्रकियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्ष बदल होवु शकतो. असा बदल वेळोवळी कार्यालयाच्या सुचनाफलकावर अधिसुचित करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना.

दिनांक :– २१/०८/२०२५

नमुना "अ"

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

(ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्यांचे नमुद करावे)
——————————— पदासाठी अर्ज

मुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो स्वाक्षरी सहित)

१. अर्जदाराचे नांव :——————— ——————— ———————

(प्रथम नांव) (पित्याचे/पतीचे नांव) (आडनांव)

२. संपूर्ण पत्ता पिनकोड क्रमांक सहीत : ——————————————————
——————————————————

पिनकोड ——————— भ्रमणध्वनी क्र.———————

३. ई–मेल : ——————————————————

४. लिंग (पुरूष/स्त्री) : ——————————

५. जात व प्रवर्ग : ——————————

६. जन्म दिनांक : ————/————/————

७. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय :———— वर्षे ———— महिने ————दिवस

८. उमेदवार अविवाहित/विवाहित : ——————————————

९. शैक्षणिक अर्हता (असल्यास) :

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०. टंकलेखन / संगणक अर्हता
(Office Assistant & Receptionist - cum - Data Entry Operator पदांसाठी आवश्यक)

| अ. क्र. | कोर्सचे नांव | शब्द प्रति मिनिट | शासकीय संस्था / मंडळ ज्यांनी टंकलेखन / श्रुतलेखनाचे/ संगणक प्रमाणपत्र दिले | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११. इतर कामामध्ये विशेष रूची :———————————
किंवा अनुभव असल्यास ———————————

१२. उमेदवाराला ओळखणा—या एक : १.———————————
प्रतिष्ठीत व्यक्तीचे नाव व पत्ता ———————————
तसेच त्याचे सदरील प्रमाणपत्र ———————————
अर्जासोबत सादर करावेत. ———————————

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो/करते की मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरूध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही व माझे विरूध्द गुन्हा दाखल झालेला नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो/करते की अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड / नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणतीही नोटीस सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

दिनांक :— / /२०२५ अर्जदाराचे नाव व सही

## प्रतिज्ञापत्र नमुना ''ब''

मी आवेदक / अर्जदार ———————————————— याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो / करते की / सांगतो / सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझेविरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :—

दिनांक :— आवेदकाचे नाव व सही

नमुना "क"

**चारित्र्य (वर्तणुक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ———————————————— हे / हया———————— तालुका ————— जिल्हा ———— येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ————— वर्षापासुन ओळखतो. त्यांची वर्तणुक व चारित्र्य चांगले आहे. ते / त्या माझे / माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरहू वर्तणुक / चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे / दिले आहे.

स्थळ :— प्रमाणपत्र देणा—याचे नाव, सही व शिक्का

दिनांक :— पत्ता ————————————————

————————————————

————————————————

भ्रमणध्वनी क्रमांक ————————

# नमुना "ड"

मी श्री / श्रीमती / कुमारी ———————————————— श्री ———————————————— यांचा / यांची मुलगा / मुलगी वय ———— वर्ष राहणार ———————————————— ———————— याद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१. मी ———————————— या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. आज रोजी मला ———— (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ——— आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :—
दिनांक :— उमेदवाराची स्वाक्षरी

## Office Assistant - 02 Posts and Peon 1 Post

### सेवाप्रवेश क्रमसुची

| अ. क्र. | दिनांक | प्रक्रिया |
|---|---|---|
| ०१ | २१ /०८ /२०२५ | जाहिरात संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिद्धीस देणे. |
| ०२ | २९ /०८ /२०२५ | उमेदवाराने अर्ज दिनांक २९/०८/२०२५ रोजी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास पाठवावेत. |
| ०३ | १० /०९ /२०२५ | छाननी करुन सुचीबध्द केलेल्या पात्र उमेदवारांची सुची संकेत स्थळावर प्रसिध्द. |
| ०४ | १४ /०९ /२०२५ | छाननी होवुन सुचीबद्ध केलेल्या Office Assistant या पदासाठीच्या उमेदवारांची इंग्रजी व मराठी भाषेतील संगणकावरील टंकलेखन परिक्षा व Peon या पदाची श्रमचाफल्य परिक्षा |
| ५ | १६ /०९ /२०२५ | Office Assistant या पदाचा इंग्रजी व मराठी टंकलेखन परिक्षेचा निकाल, Peon या पदाचा श्रमचाफल्य परिक्षेचा निकाल |
| ०६ | १९ /०९/२०२५ | Office Assistant and Peon पदासाठी मुलाखत. |